वाचले :-1) शासन निर्णय महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन क्र. आव्यप्र-2007/प्र.क्र. 125/आव्यप्र 1 दिनांक 21 जानेवारी 2010

2) शासन निर्णय महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन क्र. आव्यप्र-2017/प्र.क्र. 33/आव्यप्र-1 दि. 31 मे 2017

3) या कार्यालयाने पत्र क्र. आस्थाप-मावक/2017/08/2017 दिनांक 13/09/22017 अन्वये दिनांक 14 सप्टेंबर 2017 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात.

-0-0-0-0-0-0-0-0-

क्र. आस्थाप-मावक/कावि/2017/1/9/130
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जळगांव दिनांक: 07 /10/2017

**आदेश**

उपोद्घातातील शासन निर्णय दिनांक 21/01/2010 नुसार महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय पातळीवर 6 पदे व जिल्हा पातळीवर 34 पदे अशी एकूण 40 पदे पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने उपोद्घातातील अ.क्र. 3 नुसार दिनांक 14/09/2017 रोजी या कार्यालयाने जाहिरात प्रसिध्द करुन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (कंत्राटी) जळगांव हे पद निव्वळ अकरा महिन्याकरिता कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (कंत्राटी) जळगांव या पदासाठी प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येवून निवड समिती जळगांव यांनी गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांची शिफारस केलेली आहे. तात्पुरत्या निवड यादीतील **श्री. नरवीरसिंह प्रविणसिंह रावळ** यांची याद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव येथे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावर (ठोक मानधन रु. 30,000/- प्रति महिना या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाही.) याकामी होणारा खर्च उपोद्घातातील वाचले क्र. 2 नुसार मागणी क्र. सी-6, 2245 नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, 80 सर्वसाधारण (01)(01) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधन सामुग्रीसह सुसज्जीकरण करणे(2245 1761) 31-सहाय्यक अनुदाने, (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा. खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात (On purely temporary basis) दि.07/10/2017 ते 06/09/2018 या अकरा महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती** :-

1. वरील उमेदवाराला दिलेली नेमणूक ही निव्वळ अकरा महिन्या करिता आहे, त्यानंतर उमेदवारांची कामातील प्रगती व गुणवत्ता पाहून पुढील निर्णय घेण्यात येईल. सदर पदांना मुदतवाढ देण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल अन्यथा सदर नेमणुक आदेशाच्या दिनांकापासून अकरा महिन्याच्या कालावधीनंतर आपोआप संपुष्ठात येईल.
2. उमेदवारांने या आदेशाच्या दिनांकापासून 7 (सात) दिवसांचे आंत सदर पदावर रुजू होणे आवश्यक आहे. जर ते मुदतीत हजर झाले नाहीत तर त्यांची सदर पदावर केलेली निवड व पदस्थापना आपोआप रद्द होईल.
3. नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

4. उमेदवारांनी दिलेली माहिती, कागदपत्रे हे चुकीचे / बनावट असल्याचे भविष्यात आढळुन आल्यास संबंधित उमेदवाराची निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल.
5. वरील उमेदवाराची तात्पुरती निवड ही दरमहा ठोक मानधन व अकरा महिन्याच्या कालावधीसाठी असल्याने तात्पुरत्या निवडीचा कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरं अथवा शासन सेवेतील अन्य पदांवर नियुक्तीचा हक्क दर्शविता येणार नाही.
6. तात्पुरती निवड करण्यात आलेल्या उमेदवारास सदर पदावरील नियुक्ती सोडून जावयाचे झाल्यास किमान 15 दिवस अगोदर तशी पुर्व सूचना देणे बंधनकारक राहील.
7. संबंधित उमेदवाराची सदर पदावर करण्यात आलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असली तरीही त्यांना तात्पुरत्या नियुक्तीच्या कालावधीत भारतीय संघ राज्याशी एकनिष्ठ राहण्याची तसेच गोपनीयतेची शपथ लेखी स्वरुपात घ्यावी लागेल.
8. सदर पदावर हजर झाल्यानंतर वरील उमेदवारास खालील नमुन्यातील हमीपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापना शाखेकडेस तात्काळ सादर करावे लागेल.

**हमीपत्र**

माझी जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (कंत्राटी) या पदावर तात्पुरती नेमणुक झालेली आहे. नेमणूक आदेशातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच सदरची नेमणुक निव्वळ अकरा महिन्याकरीता असून माझी सेवा मला पुर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल याची मला पूर्णत: जाणीव असून मी सदर नेमणुक स्विकारीत आहे.

**समक्ष**
**सक्षम अधिकारी यांची सही व हुद्दा**

**उमेदवाराची सही व दिनांक**

COLLECTOR JALGAON
जिल्हाधिकारी जळगांव

किशोरराजे निंबाळकर

**(किशोरराजे निंबाळकर)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**निवड समिती जळगांव**

**प्रति,**
**श्री. रावळ नरविरसिंह प्रविणसिंह**
**एन. पी. रावळ, ए-10 अमेय अपार्टमेंट, दाभाडे बील्डींग समोर,**
**तापी नगर, यावल रोड, भुसावळ जि. जळगांव**

**प्रतिलिपी**
1. उपविभागीय अधिकारी (सर्व)/तहसिलदार(सर्व)/शाखा प्रमुख जि. का. जळगांव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.
2. तहसिलदार, (सर्वसाधारण) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
3. जिल्हा कोषागार अधिकारी जळगांव यांना माहितीसाठी रवाना.
4. मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
5. म. महालेखाकार, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

**जिल्हाधिकारी जळगांव करिता**